SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 4 4 6 दि. 31 JUL 2025

# परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्था,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठ स्मृतिचिन्ह व चषक डिझाईन स्पर्धा २०२५, विद्यापीठ स्मृतिचिन्ह व चषकांची रचनात्मक, नावीन्यपूर्ण, कलात्मक कल्पनांची मुक्तस्पर्धा बाबत.

संदर्भ :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे संदर्भ क्र. संविवि/२०२५-२६/९९३१-९९५३, दि. १९/०७/२०२५ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने स्मृतिचिन्ह व चषकांची मुक्त स्पर्धा - २०२५ चे आयोजन केले आहे. तेव्हा सर्व संलग्नित महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर माहिती दयावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू
PSPande

डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत पत्र जोडले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

# विद्यापीठ स्मृतिचिन्ह व चषक डिझाईन स्पर्धा २०२५

## विद्यापीठ स्मृतिचिन्ह व चषकांची रचनात्मक, नावीन्यपूर्ण, कलात्मक कल्पनांची मुक्तस्पर्धा

### स्पर्धेचे स्वरुप व नियम

| अ.क्र. | विवरण | लांबी | रुंदी | उंची | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | विद्यापीठ स्मृतिचिन्ह | १० इंच | ४.५ इंच | १५ इंच | विद्यापीठाचे नाव लोगो आवश्यक डिझाईनचे टेक्स मराठी भाषेत |
| २. | विद्यापीठ चषक | ८इंच | ८इंच | १८ इंच | विद्यापीठाचे नाव लोगो आवश्यक डिझाईनचे टेक्स मराठी भाषेत |

१. सदरील स्पर्धेचा कालावधी १८ जुलै २०२५ ते १० ऑगस्ट २०२५ पर्यंत आहे.

२. प्रवेशिका (डिझाईन -रंगीत) पाठविण्याचा अंतीम दिनांक १०/०८/२०२५

३. सदरील स्पर्धा सर्वांसाठी खुली असून यामध्ये विद्यार्थी, कलांवत, व्यावसायिक, जाहिरात एजन्सी ई. सहभाग नोंदवू शकतात.

४. प्रत्येक स्पर्धकाला उपरोक्त दोन्ही कलाप्रकार साठी जास्तीत जास्त दोन प्रवेशिका (डिझाईन) पाठविता येतील.

५. स्मृतिचिन्ह स्पर्धेतील विजेत्यांना अनुक्रमे प्रथम रु.५०००/-, द्वितीय रु.३०००/-, तृतीय रु.२०००/-आणि चषक स्पर्धेत अनुक्रमे प्रथम रु.३०००/-, द्वितीय रु.२०००/-, तृतीय रु.१०००/- पारितोषिक दिले जाईल. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना विद्यार्थी विकास विभागाद्वारे सहभाग प्रमाणत्र दिले जाईल.

६. स्पर्धेसाठी प्राप्त प्रवेशिका (डिझाईन), पारितोषिक प्राप्त प्रवेशिका (डिझाईन) वापराचे, त्यात आवश्यक बदल करण्याचे आधिकार विद्यापीठाचे असतील. तसेच आवश्यकता भासल्यास मूल्यांकन समितीच्या निर्णयानुसार निवडीसाठी आवश्यक ते थोडे बदल / सुधारणा करून ते डिझाईन सुधारित करुन देणे त्या स्पर्धकास बंधनकारक असेल.

७. इच्छुकांनी आपल्या प्रवेशिका (डिझाईन) दि.१०/०८/२०२५ पर्यंत विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागास dsw@bamu.ac.in या मेलवर सॉफ्टकॉपी CFD व PDF / JPJE / PNG (300 DPI) file आपले नाव / मोबाईल क्रमांक /ई-मेल व पत्ता इत्यादी माहितीसह पाठवावी आणि डिझाईनची रंगीत हार्ड कॉपी विद्यापीठ स्मृतीचिन्ह व चषक डिझाईन **स्पर्धा प्रवेशिका, द्वारा - संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर - ४३१००४** या पत्यावर पाठवणे अनिवार्य आहे. वेळेनंतर प्राप्त प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

८. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी संपर्क क्र. ७५८८१६६७८८ / ९७३०४०८३७६ वर स्पर्धकांनी संपर्क करावा.

९. उपरोक्त स्पर्धेचे डिझाईन मौलिक असावे, कोणत्याही कॉपी राईटचे उल्लंघन झाल्यास स्पर्धक स्वत; जबाबदार राहील व त्या स्पर्धकास अपात्र ठरविण्यात येईल.

१०. स्पर्धकाने सहभाग नोंदविला याचा अर्थ त्याने वरील सर्व अटी स्वीकारल्या आहेत असे गृहीत धरले जाईल.

११. स्पर्धेतील निकालाविषयी परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील.

१२. स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

१३. विजेत्या स्पर्धकांना विद्यापीठाच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात येईल, त्याविषयी विजेत्यांना दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल.

१४. विद्यापीठाला कोणतीही प्रवेशिका नाकारण्याचा किंवा स्पर्धा कोणत्याही टप्प्यावर रद् करण्याचा अधिकार असेल.

१५. या स्पर्धेतील सर्व डिझाईन या विद्यापीठाच्या मालमत्ता ठरतील व त्या वापराविषयी सर्व अधिकार विद्यापीठाकडे राहतील.

कुलसचिव
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

(नॅक ए+ दर्जा)

## विद्यार्थी विकास


संचालक (का.) २४०३११३२
विद्यार्थी विकास २४०३११३३
फॅक्स : (०२४०) २४०३११३४, २४०३११५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.net
E-Mail : dsw@bamu.ac.in

डॉ. कैलास अंभुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४
(महाराष्ट्र)
मो. क्र. : ७५८८१६५२२१


संदर्भ /संविवि/२०२५-२६/ 9931-9953 दिनांक : १९.०७.२०२५

प्रति,

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा. कुलसचिव,<br>श्रीमती नाथाबाई दामोदर ठाकरसी, महिला विद्यापीठ, मुंबई. | २ | मा. कुलसचिव,<br>महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई. |
| ३ | मा. कुलसचिव,<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर. | ४ | मा. कुलसचिव,<br>हैद्राबाद सिंध राष्ट्रीय महाविद्यालयीन मंडळ, मुंबई. |
| ५ | मा. कुलसचिव,<br>महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी,<br>जि. अहमदनगर-४१३७२२. | ६ | मा. कुलसचिव,<br>मुंबई विद्यापीठ, फोर्ट कॅम्पस, मुंबई – ४०० ०२२. |
| ७ | मा. कुलसचिव,<br>कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ,<br>कर्मवीर समाधी परिसर, पवई नाका, जि. सातारा. | ८ | मा. कुलसचिव,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,<br>लोणेरे, जि. रायगड- ४०२१०३. |
| ९ | मा. कुलसचिव,<br>शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६००४. | १० | मा. कुलसचिव,<br>वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी – ४३१४०१. |
| ११ | मा. कुलसचिव,<br>गोंडवाना विद्यापीठ, एम.आय.डी.सी. रोड,<br>गडचिरोली – ४४२६०५. | १२ | मा. कुलसचिव,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११००७. |
| १३ | मा. कुलसचिव,<br>संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती – ४४४६०२. | १४ | मा. कुलसचिव,<br>कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,<br>जळगाव – ४२५००१. |
| १५ | मा. कुलसचिव,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,<br>नाशिक – ४२२२२२. | १६ | मा. कुलसचिव,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड – ४३१६०६. |
| १७ | मा. कुलसचिव,<br>महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,<br>नाशिक – ३. | १८ | मा. कुलसचिव,<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ,<br>सोलापूर - ४१३२५५. |
| १९ | मा. कुलसचिव,<br>महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर. | २० | मा. कुलसचिव,<br>कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक,<br>जि. नागपूर. |
| २१ | मा. कुलसचिव,<br>डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,<br>अकोला-४४४१०४. | २२ | मा. कुलसचिव,<br>डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,<br>दापोली - ४१५७१२. |
| २३ | मा. कुलसचिव,<br>डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई. | | |

विषय : विद्यापीठ स्मृतिचिन्ह व चषक डिझाईन स्पर्धेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवा विद्यापीठाने स्मृतिचिन्ह व चषकांची मुक्त स्पर्धा - २०१५ चे आयोजन केले आहे. करिता सदरी माहितीपत्रक आपल्या विद्यापीठाअंतर्गत असलेल्या संलग्नित महाविद्यालय व विभागांना पाठविण्यात या ही विनंती.

धन्यवाद,

सोबत : स्पर्धेचे माहितीपत्रक.

कुलसचिव